# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

प्र.ले./वित्त/प्रकल्प/शहर/१७ दिनांक: ०६.०९.२०१७

विषय: जीएसटी अंमलबजावणीनंतर महानगरपालिकेतील कंत्राटांत होणा-या बदलाबाबत.

संदर्भ: १) शासन परिपत्रक क्र.जीएसटी-१०१७/प्र.क्र.८१/कराधान-१ दिनांक १९, ऑगस्ट,२०१७.
२) परिपत्रक क्र. प्र.ले./वित्त/प्रकल्प/शहर/१६ दिनांक:३१.०८.२०१७
३) परिपत्रक क्र. प्र.ले./वित्त/प्रकल्प/शहर/८ दिनांक:१४.०७.२०१७

दिनांक १ जुलै, २०१७ पासुन वस्तु व सेवा कर अंमलात आला असून त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने उपरोक्त संदर्भ क्र. १ च्या परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना प्रसृत केल्या आहेत. सदर सूचनांच्या अंमलबजावणीसाठी महापालिकेने संदर्भ क्र.२ अन्वये परिपत्रक जारी केले आहे. सदर शासन परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांची महापालिकेत अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे अतिरिक्त निदेश देण्यात येत आहेत.

१) <u>शासन परिपत्रकातील बाब क्र.१:- दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ नंतर काढण्यात येणारी कंत्राटे:</u>

यापुढे मागविण्यात येणाऱ्या, प्रत्येक दरपत्रिका/अतारांकित निविदा/ई-निविदांमध्ये वस्तु व सेवाकराच्या बोजाचा विचार करूनच निविदाकारांनी दरपत्रिका/अतारांकित निविदा/ई-निविदांचे दर सादर करण्यासाठी उपरोक्त संदर्भित क्र.३ परिपत्रकामध्ये दिलेल्या अटीचा, त्याचप्रमाणे खालील अटीचाही समावेश करावा.

"Chapter XXI-Miscellaneous, section 171(1) of GST Act, 2017 governs the 'Anti Profiteering Measure' (APM).

As per the provision of this section, 'Any reduction in rate of tax on any supply of goods or services or the benefit of input tax credit shall be passed on to the recipient by way of commensurate reduction in prices'

Accordingly, the contractor should pass on the complete benefit *accruing to him on account of reduced tax rate or additional input tax credit,* to MCGM.

Further, all the provisions of GST Act will be applicable to the tender."

२) ज्या दरपत्रिका/अतारांकित निविदा/ई-निविदा २२ ऑगस्ट, २०१७ पूर्वी मागविलेल्या आहेत व ज्यांचा लिफाफा अ उघडण्यात आलेला नसून त्यांच्या नियत दिनांकास अजूनही अवधी शिल्लक आहे, अशा दरपत्रिका/अतारांकित निविदा/ई-निविदांच्या बाबतीत, सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने, शुद्धीपत्रकाद्वारे (Corrigendum), वरिल बाब क्रमांक १ मध्ये दिलेल्या अटींचा समावेश करावा व त्यासाठी आवश्यक असल्यास नियत दिनांक वाढविण्यात (Extend) यावी.

Scanned by CamScanner

३) अतितात्काळ कामे:

शासन परिपत्रकाप्रमाणे, अतितात्काळ स्वरूपाच्या कामाबाबतच्या निविदांची प्रक्रिया पूर्ण करण्यात येऊन त्यांचे कार्यारंभ आदेश देण्यात यावेत. मात्र सदर निविदा स्विकृत करताना जीएसटी अंतर्गत येणाऱ्या कराचा बोजा लक्षात घेऊन कंत्राटदाराशी वाटाघाटी करून दर कमी करण्याचा प्रयत्न करण्यात यावा. तथापि, त्याआधी अशी कामे अतितात्काळ असल्याबाबतच्या समर्थनिय सविस्तर कारणासंह प्रस्ताव सादर करून संबंधित अतिरिक्त आयुक्त यांची प्रशासकिय मान्यता घेणे आवश्यक आहे.

सर्व खातेप्रमुख/सहा.आयुक्त/वैद्यकिय अधिष्ठाता यांनी त्यांच्या अखत्यारीतील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना उपरोक्त सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश द्यावेत.

(रा.क.आव्हाड)
प्रमुख लेखापाल (पा.पु.म.नि.)

(प्रदिप पडवळ)
प्रमुख लेखापाल (वित्त) प्र.

(राम धस)
उप आयुक्त (म.ख.खा.)

(सुधीर नाईक)
उप आयुक्त (सा.प्र. )

(डॉ.संजय मुखर्जी)
अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प)

Scanned by CamScanner